INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# ग्रामीण महिला सबलीकरण

**सौ. चित्रलेखा श्रीमंत ढोले**
उपाध्यक्षा,
JBVP लाखेवाडी
लाखेवाडी, ता. इंदापूर, जि.पुणे

DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/10.2021-14296987/IRJHIS2110010

***सारांश :***

*भारतासारख्या विकसनशील देशात जागतिकीकरणाच्या युगात स्त्रियांच्या जीवनात थोडाफार बदल झाला. तिच्या जीवनात समानता, हक्क यां सारख्या संधीनी प्रवेश केला याचा उपयोग शहरी भागातील महिलांना थोड्या प्रमाणात झाला. यांच्यात सर्व बाजुंनी परिवर्तन घडून आले. पण ग्रामीण भागातील महिला मागासलेल्या राहिल्या त्यामुळे या महिलांचे जेव्हा आर्थिक, मानसिक व सामाजिक सबलीकरण होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने माहिला सबलीकरण संकल्पना यशस्वी होणार आहे.*

***महत्वाचे शब्द :*** *जागतिकीकरण, ग्रामीण माहिला, आर्थिक स्वावलंबन, समानता, हक्क, सबलीकरण*

**प्रस्तावना :**

आजचे युग हे 'जागतिकीकरणाचे' युग आहे. उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण या त्रितत्त्वसूचीनी व त्यांच्या ध्येय धोरणांने माणसाच्या विचारापासून ते आचारापर्यंत बदल घडविला आहे. जागतिकीकरणामुळे मनुष्यजातीचे सर्वांगीण जीवन व्यापून टाकले आहे. मानवाची सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक इ. सर्वच क्षेत्रे जगतिकीकरणामुळे प्रभावित झाली आहेत. आज असे एकही क्षेत्र नाही की जिथे जागतिकीकरणाने प्रवेश केलेला नाही. समकालीन राजकीय तत्त्वज्ञान, सामाजिक व संस्कृतिक जीवन, आर्थिक संस्था व प्रक्रिया, माहिती आणि तंत्रज्ञान इ. सर्व क्षेत्रांना या संकलपेने व्यापून टकले आहे. जागतिकीकरणामुळे जागतिक आणि स्थानिक असा भेद नष्ट करून संपूर्ण जगाला एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आहे. जागतिकीकरण ही विविध पातळयांवर लोकांमधील तसेच राष्ट्रा-राष्ट्रांमधील सहसंबंध वाढविणारी प्रक्रिया आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार्याची भूमिका वाढल्याचे दिसत आहे. शीतयुद्धाचा शेवट

आर्थिक संबंधांना प्राप्त झालेले प्राधान्य माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात घडून आलेली क्रांती विश्व व्यापार संघटना तसेच विविध व्यापारी संघांची झालेली निर्मिती यामुळे एका विश्व संस्कृतीच्या तसेच विश्व आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेच्या निर्मितीच्या दिशेने प्रयत्न होत आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे लोकांमधील अंतर कमी होऊन विश्वग्राम (Global Village) ही संकल्पना आकाराला येत आहे.

**महिला सबलीकरणाचा अर्थ :**

भारताला स्वातंत्र्य मिळून 74 वर्षे पूर्ण झाली आहेत. परंतु आजही स्वातंत्र्याच्या आणि समानतेच्या हक्कापसून भारतीय समाजातील महिलांसारखा मोठा गट वंचित आहे. सभ्यतेच्या विकासाच्या काळात मातृसत्ताक संस्कृती होती. परंतु नंतरच्या काळात समाज पितृसत्ताक संस्कृतीकडे वळाला आणि त्याचा प्रभाव निश्चितच स्त्रियांच्या स्थितीवर व दर्जावर पडला तेव्हापासून आधुनिक युगापर्यंत भारतासारख्या परंपरागत देशातील स्त्रियांना एक चाकोरीबद्ध जीवन जगावे लागले आहे.

'सबलीकरण' म्हणजे दुर्बलता नष्ट करणारी संकल्पना होय. 'स्त्री सबलीकरण' म्हणजे स्त्री पुरुष समानतेचा स्वीकार करून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने विकासाच्या व प्रगतीच्या संधीउपलब्ध करून देणारी ही प्रक्रिया आहे. याद्वारे स्त्रियांमध्ये स्वतःची जाणीव निर्माण करणे, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने समता प्रस्थापित करणे होय. लिंगभेदावर आधारित समाजव्यवस्था नष्ट करून नवीन समाज रचना निर्माण करणे, सत्ता आणि संधी पासून वंचित महिलांना मग ती शहरी असो वा ग्रामीण कोणत्याही भेदभावाशिवाय प्रगती करण्याची संधी देणे म्हणजे महिला सबलीकरण होय. महिलांना त्यांचे मूलभूत हक्क व अधिकार प्राप्त करून देण्यासाठी व त्यांना संरक्षण देण्यासाठी अनेक घटनात्मक कायदे तयार करण्यात आलेले आहेत. स्त्री-पुरुष समानता, समान न्यायव्यवस्था, स्त्री-शिक्षण, महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे, आर्थिक व्यवहार आणि संपत्ती मध्ये सहभागी करून घेणे, राजकीय सहभाग वाढविणे, अभिव्यक्ती आणि विचार स्वातंत्र्य इ. अनेक उद्दिष्ट्ये महिला सबलीकरणाची आहेत.

श्री. किरण देवेंद्र यांच्या मते, 'महिला सबलीकरणाचा अर्थ, महिला ही आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र, आत्मनिर्भर व स्वावलंबी असणे होय'. तिला स्वतःबद्दल सकारात्मक दृष्टीकोण असावा. जेणेकरून कोणत्याही विपरीत परिस्थितीला तिला एकटीला सामोरे जाता येईल. विकास कार्यात सहभागी होऊ शकेल याकरिता 'शिक्षण' हा सबलीकरणासाठी महत्त्वाची भूमिका बजावणारा घटक आहे.

भारत सरकारच्या कंट्री रिपोर्टनुसार, 'सबलीकरण म्हणजे बळजबरीने दुर्बल ठेवण्याच्या अवस्थेकडून सशक्तीकडील वाटचाल होय.' याद्वारे स्त्रियांमध्ये स्वतःबद्दलची सकारात्मक प्रतिमा

निर्माण होते व त्यांच्या क्षमतेत वाढ होते. सबलीकरणाविषयी श्री.संदीपकुमार चौधरी म्हणतात की, 'सशक्तीकरण किंवा सबलीकरण म्हणजे स्त्रियांना स्वावलंबी बनविणे असा ढोबळ मानाने अर्थ काढता येईल. सामाजिक दृष्टीकोणातून स्त्रियांवर अन्याय सुरू आहे. या अन्यायाची भरपाई करणे म्हणजे महिलांचे सबलीकरण होय. तसेच 'स्त्री सबलीकरण म्हणजे स्त्रियांची स्थिति सुधारण्यासाठी स्त्रीला आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, नैतिक, राजकीय व सांस्कृतिक दृष्टीने सदृढ करणे होय.'

महिला सबलीकरणाचा खरा अर्थ, महिलेच्या खऱ्या बुद्धिमत्तेला, सुप्तशक्तीला किंवा कार्यक्षमतांना, सामर्थ्याला धारण क्षमतेला फुलविणे तसेच स्वतःची खरी ओळख, अस्तित्त्व, विचार स्वातंत्र्य, अभिव्यक्ती, प्रत्यक्षकृती तसेच तिच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्राला हाताळण्याचे सामर्थ्य तिच्यात निर्माण करणे होय. स्त्रियांना केवळ त्यांच्यातील क्षमतेची जाणीव करून न देता त्यासोबतच त्यांना आवश्यक त्या संधी, सुविधा, बाह्य व आंतरिक वातावरण निर्माण करून देणे, त्यांच्या जन्मजात गुणांचा, क्षमतांचा यथा योग्य वापर करून त्यांच्यात आत्मविश्वास, आत्मनिर्भरता निर्माण करून देणे हे महिला सबलीकरणासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. तिच्यावर होणाऱ्या अन्याय व शोषणाविरुद्ध आवाज उठविणे, स्वतःच्या अस्तित्त्वासाठी लढणे, संघर्ष करणे या क्षमता तिच्यात निर्माण करणे, विकसित करणे म्हणजे खऱ्या अर्थाने महिलांचे सबलीकरण होय.

**ग्रामीण महिलांचे सबलीकरण :**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. देशाची जास्तीत जास्त लोकसंख्या ही ग्रामीण भागात आहे. त्यामुळे ग्रामीण महिलांचा विकास होणे, त्यांच्या समस्यांचे निराकरण होणे व योग्य त्या उपाय योजना होणे अत्यंत आवश्यक आहे. आजच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या काळातही ग्रामीण महिलांचे साक्षरतेचे, स्वावलंबनाचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. ग्रामीण महिलांना त्यांचे मूळ ज्ञान,कौशल्य आणि लघु व्यवसाय निर्मितीसाठी सक्षम बनविणे आवश्यक आहे. ग्रामीण महिलांचा कौटुंबिक आणि सामाजिक योगदानामध्ये सिंहाचा वाटा आहे. परंतु असे असले तरी, त्यांना विकासाच्या संधीमध्ये अतिशय अल्प वाटा मिळतो. बहूतेक वेळा त्यांना शिक्षण चांगल्या नोकरी, राजकीय व्यवस्थेत सहभाग आणि चांगल्या आरोग्य सेवा, निर्णय क्षमतेतून वगळले जाते. याशिवाय त्यांना शारीरिक, मानसिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे की जो त्यांच्या सबलीकरणात अडथळा निर्माण करतात. भारतासारख्या लोकशाही प्रधान देशामध्ये स्त्री-पुरुष यांच्यामधील दरी कमी करण्यासाठी रणनीती ठरविली गेली १९५० मध्ये या कार्यक्रमाचा दृष्टिकोन 'कल्याण' हा होता तर १९७० च्या सुमारास 'विकास' हा दृष्टीकोन

होता आणि १९८० पासून 'सबलीकरण ' हा दृष्टीकोन विकसीत झाला. 'सबलीकरण' म्हणजे एखाद्याला सामर्थ्यवान बनविणे भारतातील ग्रामीण भागातील बहूसंख्य महिला या घरकामात गुंतलेल्या आहेत. कोणत्याही व्यक्तीला समाजामध्ये माणूस म्हणून जगायचे असेल तर आर्थिक स्वावलंबन आवश्यक आहे. स्त्रियांच्या आर्थिक परिस्थिती बाबत कार्ल मार्क्स असे म्हणतात की, उत्क्रांतीच्या टप्प्यावरुन पुढे सरकत असताना आणि रानटी अवस्थेतून सांस्कृतिक अवस्थेपर्यंत येताना उत्पादन साधने विकसित होत गेली. त्यानंतर खाजगी मालमत्ता ही संकल्पना रुढ झाली आणि संपत्ती वरील इतर हक्क पुरुषांकडे गेले. वरील संदर्भानुसार वेतनासंबंधी भेदभाव, स्वयंरोजगार अर्थसहाय्यतेचा अभाव, बेरोजगारी, उद्योगविकास उदासिनता शेतीजमिनीवर हक्क नाही इ. अनेक कारणांमुळे स्त्रीचे आर्थिक स्थान कायमचं दुय्यम राहिले महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देऊन आर्थिकदृष्टया महिला सबलीकरण करणे महत्वाचे आहे. महिलांना अर्थिक हक्क मिळवून देणे. त्यांना उत्पादन प्रकियेत सहभागी करुन घेणे यांसारख्या बाबींना प्राधान्य दिले तरचं खऱ्या अर्थाने राष्ट्राचा विकास होणार आहे.

ग्रामीण महिला या दारिद्रयरेषेखाली व अत्यंत गरीब व कष्टदायी जीवन जगन असतात. त्यामुळे त्यांच्या एकत्रीकरणासाठी, त्यांच्या क्षमता विकासासाठी उपयुक्त अशी उपाययोजना करुन त्यांना सामाजिक व आर्थिक पर्यायांची संधी देण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. महिलांना शेती, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मृदासंवर्धन, कुक्कुपालन, मत्सपालन, कुटीरेद्योग यांसारख्या शेती पुरक व्यवसायांचे प्रशिक्षण दिल्यास महिलांच्या ज्ञानाच्या व कामाच्या कक्षा रुंदावन जातील आणि त्याचा उपयोग राष्ट्र उभारणी मध्ये होईल आणि तेव्हाचं खऱ्या अर्थाने जागतिकीकरणाची व्याख्या व संकल्पना यशस्वी होईल.

**समारोप :**

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात कोणत्याही विकसनशील देशातील समुदायाचा आर्थिक विकास आणि सामाजिक स्थितीचे मोजमाप हे स्त्रियांचे स्थान व दर्जा वरुन केले जाते. त्यामुळे महिलांना मुख्य प्रवाहात आणून राष्ट्र उभारणीच्या व विकासाच्या प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढविणे ही काळाची गरज आहे. त्यांचे सामाजिक, आर्थिक व मानसिक सबलीकरण करणे त्यासाठी विविध उपक्रम राबविणे त्यांची अंमलबजाणी करणेआवश्यक आहे. ग्रामीण महिलांचे सबलीकरण ही जागजिकीकरणाची एक महत्त्वाची जबाबदारी आहे. त्यामुळे त्यांच्या समस्या, अडचणी सोडविणे ही काळाची गरज आहे आणि त्यानंतरच जागतिकीकरण खऱ्या अर्थाने होणार आहे.

**संदर्भ सूची :**

१. डॉ.आढाव विलास, महिला सबलीकरण प्रौढ निरंतर शिक्षण विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे.

२. डॉ. वारुंगळे पाटील संभाजी, ‘महिला सबलीकरण शासनाची भूमिका’, गोल्डन रिसर्च चार्ट, मार्च २०१४